**<u>रे.दि.मु.क्र.८५८/२०२३</u>**

सुर्यकांत धोंडीराम कदम
वि.
कै सुभाष शामराव कदम म.वा. (विमल सुभाष कदम )वगैरे

## <u>रे.दि.मु.नं. ८५८/२०२३ मधील निशाणी १२ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र १ अ ते १ ड यांनी त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येवून कैफियत दाखल करणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र १ अ ते १ ड यांचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र १ अ ते १ ड यांना दाव्याचे समन्स दि. १५.१२.२०२३ रोजी लागले असुन ते दि. १३.०२.२०२४ रोजी वकीलामार्फत हजर होऊन कैफियत देणेस मुदतीची मागणी केली. दि. २०.०३.२०२४ रोजी पुन्हा प्रतिवादी क्र १ अ ते १ ड यांनी कैफियत देणेस मुदत मागणीचा अर्ज दिला असुन दि. १५.०४.२०२४ रोजी काही तांत्रीक अडचण राहु नये म्हणुन प्रतिवादी क्र. १ अ ते १ ड यांनी अर्जासोबत त्यांची कैफियत दाखल केलेली आहे. त्यामुळे कैफियत अभिलेखावर घेणेबाबत न्यायाचे आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे **(नि.१३)** दाखल करुन प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज, खोटा व लबाडीचा असलेने तो वादीस मान्य व कबुल नाही. प्रतिवादी नं १ यांचे वारसांना दि. १५.१२.२०२३ रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झाली असुन कैफियत देणेकरीता ३० दिवसाची मुदत होती. परंतु प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात कैफियत देणेस किती दिवसांचा उशीर झालेला आहे. याचा उल्लेख केला नसल्याने व उशीराबद्दलची कोणतीही समाधानकारक कारणे दिली नसलेने अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे. तसेच कैफियत देणेस ९० दिवसांची मुदत असताना सुद्धा त्या कालावधीत कैफियत दिलेली आहे. यदाकदाचित अर्ज मंजुर करणेचे झालेस वादीस प्रतिवादींनी दिलेल्या मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल वादीला कंम्पेनसेटरी कॉस्ट रक्कम रुपये ५,०००/- देण्यासाठी न्यायालयाचे योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुद्ध हुकुमी ताकीद व अतिक्रमीत क्षेत्र पुर्ववत होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी हे दाव्याकामी हजर झाले परंतु त्यास कैफियत दाखल करण्यास ४ महिन्यांचा विलंब झालेला आहे. दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर प्रतिवादींचे अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रतिवादींना त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादींवर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र १ अ ते १ ड यांचा निशाणी १२ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र १ अ ते १ ड वर एकत्रीतरीत्या खर्च रक्कम रुपये ३००/–(तीनशे रुपये मात्र) लादून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र १ अ ते १ ड ची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

PRAJAKTA GAJANAN SHELAR

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.11.13 16:53:49 +0530

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–१३.११.२०२४ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड